# मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत



# देखणा मुर्ख राजा


लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Lyn Doerksen



60 गोष्टींतील 18 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi

इस्त्राएलांचा शास्ता आणि पुढारी शमुवेल आता म्हातारा झाला होता. त्याच्या जागेवर देवाची सेवा करण्यासाठी त्याने त्याच्या मुलाला इस्त्राएलांवर शास्ता नेमले. परंतू शमुवेलचे मुलगे दुष्ट होते. त्यांना पैसा प्रीय होता आणि अप्रामाणिकपणे पैसा मिळविण्यासाठी ते त्यांच्या अधिकाराचा वापर करित होते.



1

मुलांच्या दुष्टतेमुळे इस्त्राएल लोकांना त्रासातून जावे लागले. न्यायालयात विपरीत न्याय केला जाई.



2


लोकांना जेंव्हा केंव्हा मदतीची गरज लागे त्या प्रत्येक वेळी शमुवेलच्या लोकांना पैसा द्यावा लागत असे; ते लाच घेत असत.
3


काहीतरी करायला हवे. एके दिवशी इस्त्राएलचे सर्व वडील जमा होऊन शमुवेलकडे गेले व त्यांनी त्याच्याकडे मदत मागितली.
4


"ते वडील त्यास म्हणाले," आमचा न्यायइन्साफ करावयास आम्हांवर एक राजा नेमा. शमुवेलच्या दुष्ट मुलांनी त्यांचा न्याय करावा अशी त्यांची इच्छा नव्हती. तर त्याच्या अवतीभोवती असलेल्या सर्व राष्ट्रांप्रमाणे त्यांना देखिल एक राजा असावा अशी त्यांची इच्छा होती.
5


शमुवेलला याचा राग आला. कारण इस्त्राएलांवर आधिच राजा होता ! सर्व समर्थ प्रभू परमेश्वर, जो अनंतकालिक आहे, तो इस्त्राएलांवर राज्य करित होता.
6


फार वर्षांपूर्वी त्याने मिसर देशाच्या गुलामगीरीतून इस्त्राएल लोकांना सोडवले होते, त्यांच्या सुटकेसाठी त्याने तांबडा समुद्र दुभागला होता. आणि मग त्याने इस्त्राएलांना त्यांची सुंदर भूमि वतन करुन दिली.
7


जेंव्हा शमुवेलाने प्रार्थना केली, तेंव्हा परमेश्वर शमुवेलास म्हणाला, "त्यांनी माझा धिक्कार केला नाही, तर मी त्यांच्यावर राजा असू नये म्हणून त्यांनी माझा धिक्कार केला आहे.
8


त्यांनी अन्य देवांची सेवा केली. त्यांचे म्हणणे ऐक आणि त्यांना राजा दे."
9


त्यांचा पृथ्वीवरील राजा कसा असेल याविषयी लोकांची चांगली कानउघाडणी करण्यास परमेश्वराने सांगितले.
10


तो त्यांचा पैसा कर म्हणून वसूल करील; त्यांची उत्तम शेती व द्राक्षमळे तो स्वतः ठेऊन घेईल; त्यांच्या लेकरांना त्याच्या सैन्यात भरती होण्याची आज्ञा करेल; आणि त्यांच्या मुलिंना त्याच्यासाठी काम करण्याची तो आज्ञा करेल.
11


शाही द्राक्षमळा
परंतू कसेही करुन लोकांना राजा हवा होता.
परवानगी नाही
12


परमेश्वराने शमुवेलला एका तरुणाकडे नेले, तो तरुण फार देखणा, फार लाजाळू, आणि फार उंच होता – त्याच्या ऐवढा उंच साऱ्या इस्त्राएलांत कोणी नव्हता. त्याचे नाव शौल असे होते. जेंव्हा शमुवेलाने शौलाला पाहिले तेंव्हा परमेश्वर म्हणाला, "हा माझ्या लोकांवर सत्ता चालविल."
13


आज्ञापालन करित, शमुवेलाने शौलाला इस्त्राएलांचा राजा होण्यास अभिषेक केले. शौलाला जेंव्हा इस्त्राएल लोकांसमोर आणण्यात आले तेंव्हा, "राजा चिरायु होवो!" असे मोठ्याने म्हटले.
14

लवकरच शौल राजाला पारखण्यात आले. अम्मोनी, जो इस्त्राएलांचा व्देष करित होता, त्याने इस्त्राएलांच्या शहराला वेढा दिला आणि त्याने इस्त्राएल लोकांचा उजवा डोळा फोडून टाकाण्याची योजना आखली होती.



15

कित्ती क्रूर योजना ! या धमकीची बातमी शौल राजा पर्यंत जाऊन पोचली. त्याने त्याचे सैन्य तयार केले.



16



जेंव्हा दोन्ही सैन्य समोरा-समोर आले, शौलाने अम्मोन्यांचा पराभव केला आणि इस्त्राएलांच्या शहराला त्यांच्या तावडीतून सोडवले. "...आज परमेश्वराने इस्त्राएलाचा उध्दार केला आहे." असे म्हणत शौल राजाने परमेश्वराला गौरव दिले.

17

त्या दिवशी देवाने शौलाला मोठा विजय दिला. परंतू प्रत्येक वेळी शौलाने देवाचा सन्मान केला नाही. एके दिवशी पलिष्टी लोकांशी युध्द् करण्याआधि शौलाने स्वतः होमार्पण केले. ते शमुवेलाचे काम होते हे त्याला माहित होते.



18

शमुवेल होमार्पण करण्यासाठी येईल तोवर त्याने वाट पाहावी अशी देवाची अपेक्षा होती हे त्याला माहित होते. परंतू शौलाने देवाची आज्ञा पाळली नाही.



19



जेंव्हा शमुवेल तेथे येऊन पोहोचला, तेंव्हा तो शौलास म्हणाला, "तूं मुर्खपणा केला आहे. तुझा देव परमेश्वर याने केलेली आज्ञा तूं मानिली नाही. तर आता तुझे राज्य कायमचे राहावयाचे नाही."

20













देखणा मुर्ख राजा

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

१ शमुवेल ८–१६

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!